प्रेसनोट दि.१३/०९/२०१८

**"वाहन चोरीतील इसमास अटक केले बाबत.."**

**पो.हवा.दिनेश शिंदे ,विनोद सांळुके, रियाज शेख, निशीकांत सांवत, संदीपकुमार गर्जे, शिनलकर यांची उत्कृष्ट कामगिरी**

**कोरेगांव पार्क पो स्टे पुणे शहर**

---

कोरेगाव पार्क पो स्टे तपास पथकाचे पो.हवा.दिनेश शिंदे ,विनोद सांळुके, रियाज शेख, निशीकांत सांवत, संदीपकुमार गर्जे असे दि.३०/०८/२०१८ रोजी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे हददी मध्ये पेट्रोलींग करीत असताना मदारी वस्ती,येथे आलो असता १६/३० वा. एका वाहन चालकास आम्ही थांबविण्याचा प्रयत्न केला असता तो मोटार सायकल सोडुन पळुन जावु लागला. तेव्हा स्टाफच्या मदतीने त्यास थोडया अंतरावर पकडुन त्याचे नाव व पत्ता विचारता त्याने त्याचे नांव रॉनाल्ड क्रिस्टीफर सॅमुअल,रा.माऊटेन हाय रेस्टॉरंट,आझादनगर,हेवेन पार्क सांळुके-विहार,पुणे असे सांगितले. त्याचेकडील मोटार सायकलची पाहणी केली असता,मोटार सायकलच्या समोरच्या नंबर प्लेटवर एम.एच/१२/पी.एच/९१५ असा दिसत असुन मागील बाजुस नंबर प्लेट काढल्याचे दिसुन येत आहे. त्याचे मोटार सायकलचे लायसन्स व कागदपत्रे मागितले असता,त्याबाबत असमाधानकारक व उडवा-उडवीचे उत्तरे देवु लागला. तसेच मोटार सायकलचे मालका बाबत विचारले असता,त्याबाबतही उडवा-उडवीचे उत्तरे देत असल्याने त्याचा आम्हास संशय आला. त्यास कोरेगाव पार्क पो स्टे येथे घेवुन मोटार सायकलवर असलेल्या चॅसि व इंजिननंबरवरुन माहिती घेतली असता,सदर मोटार सायकल नंबर एम.एच/१२/पी.आर/३९१५ असा आहे. त्याबाबत खात्री केली असता सदरची मोटार सायकल ही कोरेगाव पार्क पो.स्टे. गु.र.नं.८४/२०१८,भा.दं.वि.कलम ३७९ मधील असल्याचे निष्पन्न झाले. सदर गुन्हयातील आरोपी हा फिर्यादी यांचे येथे ऑफिस बॉय म्हणुन काम करीत असताना त्यांची मोटार सायकलची डुल्बीकेट चावी तयार करुन मोटार सायकल चोरुन नेली असल्याचे समजले.

सदरची कामगिरी मा.बच्चन सिंग,पोलीस-उप-आयुक्त,परिमंडळ-२,पुणे शहर,जयश्री गायकवाड, सहा.पो.आयुक्त,लष्कर विभाग,पुणे शहर, मदन बहाद्दरपुरे,वरिष्ठ पो.निरी. कोरेगाव पार्क पो स्टे पुणे यांचें मार्गदर्शनाखाली **पो.हवा.दिनेश शिंदे ,विनोद सांळुके, रियाज शेख, निशीकांत सांवत, संदीपकुमार गर्जे, शिनलकर** यांनी केली आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**